14 FEB 2024 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# रूपाली पणदूरकर यांच्या नावे अभ्यासिका

## आई-वडिलांच्या हस्ते भूमिपूजन : सप्टेंबरपर्यंत काम पूर्ण करण्याची ग्वाही

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे निवृत्त भूगोल अधिविभाग प्रमुख व ज्येष्ठ कायदेतज्ज्ञ डॉ. (ॲड.) राम पणदूरकर व त्यांच्या पत्नी हेमकिरण यांनी पेन्शन बचतीतून साठविलेल्या ३५ लाख रुपयांच्या पुंजीतून त्यांची एकमेव दिवंगत कन्या डॉ. (ॲड.) रूपाली पणदूरकर यांच्या स्मरणार्थ विद्यापीठात साकारत असणारी विद्यार्थिनींसाठीची अभ्यासिका ही विद्यापीठास अमूल्य भेट आहे, असे भावोद्‌गार कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी मंगळवारी येथे काढले. येत्या सहा महिन्यांत या इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्याची ग्वाही त्यांनी दिली.

डॉ. पणदूरकर यांनी दिलेल्या देणगीमधून विद्यापीठातील 'कमवा व शिका' विद्यार्थिनी वसतिगृह परिसरात रूपाली पणदूरकर यांच्या नावे अभ्यासिकेचे भूमिपूजन अत्यंत हृद्य वातावरणात झाले. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्यासह पणदूरकर दाम्पत्य आणि त्यांचे नातेवाईक, मित्रपरिवार उपस्थित होते.




डॉ. (ॲड.) रूपाली पणदूरकर यांच्या स्मरणार्थ विद्यापीठात साकारत असलेल्या विद्यार्थिनींसाठीच्या अभ्यासिकेचे भूमिपूजन मंगळवारी पणदूरकर दाम्पत्यांच्या हस्ते झाले. यावेळी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

### अभ्यासिकेविषयी

रुपाली पणदूरकर अभ्यासिका इमारतीच्या आराखड्यामध्ये तळमजला अधिक दुमजली इमारत प्रस्तावित आहे. पहिल्या टप्प्यात १८३२ चौरस फूट क्षेत्रफळाचा तळमजला होणार आहे. अरिहंत कन्स्ट्रक्शन कंपनीला ठेका दिला असून, सहा महिन्यांत हे काम पूर्ण होणार आहे. शंभर विद्यार्थिनींची अभ्यासाला बसण्याची सोय असेल. पुढे ३०० विद्यार्थिनींची सोय होईल.

यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख आदि उपस्थित होते.

14 FEB 2024 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थिनी अभ्यासिकेचे भूमिपूजन

## डॉ. रूपाली पणदूरकर यांच्या स्मरणार्थ दिलेल्या देणगीतून बांधकाम

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १३ : शिवाजी विद्यापीठाचे निवृत्त भूगोल अधिविभाग प्रमुख व ज्येष्ठ कायदेतज्ज्ञ डॉ. (ॲड.) राम पणदूरकर आणि त्यांच्या पत्नी हेमकिरण यांनी पेन्शन बचतीतून साठविलेल्या ३५ लाख रुपयांच्या पुंजीतून त्यांची एकमेव दिवंगत कन्या डॉ. (ॲड.) रूपाली पणदूरकर यांच्या स्मरणार्थ विद्यापीठात साकारत असणारी विद्यार्थिनींसाठीची अभ्यासिका ही त्यांची विद्यापीठास अमूल्य भेट आहे, असे भावोद्‌गार कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी आज येथे काढले. सहा महिन्यांत या इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्याची ग्वाही त्यांनी दिली.

विद्यापीठातील कमवा व शिका विद्यार्थिनी वसतिगृह परिसरात विद्यार्थिनींसाठी डॉ. रूपाली पणदूरकर यांच्या नावे स्वतंत्र अभ्यासिका बांधण्याच्या कामाचे भूमिपूजन आज सायंकाळी झाले. यावेळी ते बोलत होते.

डॉ. पणदूरकर यांनी कै. रूपाली पणदूरकर यांचा स्मृतिदिन १५ सप्टेंबर असून, त्या दिवशी या अभ्यासिकेचे उद्‌घाटन करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. श्रीकृष्ण महाजन, महादेव देशमुख, रामचंद्र पवार, रघुनाथ ढमकले, संभाजी शिंदे, प्रतिमा पवार, माधुरी वाळवेकर, विद्या चौगुले, कविता वड्राळे, गिरीश कुलकर्णी, रमेश पोवार, रणजित यादव, विजय पोवार, अमित कांबळे, शिवकुमार ध्याडे, जी. बी. मस्ती, वैभव आरडेकर उपस्थित होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या प्रस्तावित डॉ. रूपाली पणदूरकर अभ्यासिकेच्या भूमिपूजनप्रसंगी सोमवारी कोनशिलेचे अनावरण करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. राम पणदूरकर, हेमकिरण पणदूरकर, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आदी.

### अशी असणार इमारत

इमारतीच्या आराखड्यामध्ये तळमजला अधिक दुमजली इमारत प्रस्तावित आहे. पहिल्या टप्प्यात १८३२ चौरस फूट क्षेत्रफळाचा तळमजला बांधण्यात येणार आहे. येथे एकाच वेळी शंभर विद्यार्थिनींना अभ्यासाला बसता येईल. पुढील दुमजली बांधकामानंतर एकूण ३०० विद्यार्थिनींची सोय होईल.

14 FEB 2024

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ई-कचरा व्यवस्थापन क्षेत्रात उद्योग निर्मितीच्या संधी : डॉ. लम्पाऊ

## शिवाजी विद्यापीठात आंतरराष्ट्रीय वेबिनार

कोल्हापूर : प्रतिनिधी

जगभरात दरवर्षी ६२.५ अब्ज डॉलर्स इतक्या किंमतीचा ई-कचरा निर्माण होत असल्याचे संयुक्त राष्ट्रांचा पर्यावरणविषयक अहवाल सांगतो. त्यामुळे आजघडीला ई-कचरा व्यवस्थापनाच्या क्षेत्रामध्ये उद्योग निर्मितीच्या अनेक संधी आहेत. त्यांचा लाभ घेऊन पर्यावरण स्वच्छ करण्यासाठी संशोधकांनी पुढे येण्याची गरज आहे, असे प्रतिपादन ग्रीस मंत्रालयाच्या शैक्षणिक सल्लागार डॉ. रानिया लम्पाऊ यांनी मंगळवारी केले.

शिवाजी विद्यापीठाचा इलेक्ट्रॉनिक्स अधिविभाग आणि ई-कचरा व्यवस्थापन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी 'इलेक्ट्रॉनिक कचरा आणि शाश्वत विकास' या विषयावरील तीनदिवसीय आंतरराष्ट्रीय वेबिनारला प्रारंभ झाला. त्यावेळी बीजभाषक म्हणून त्या बोलत होत्या. तत्पूर्वी, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत या परिषदेचे औपचारिक उद्‌घाटन करण्यात आले.

यावेळी डॉ. लम्पाऊ म्हणाल्या, इलेक्ट्रीकल आणि इलेक्ट्रॉनिक कचऱ्यामुळे जागतिक स्तरावर निर्माण झालेल्या पर्यावरणविषयक समस्यांचा आणि त्यावरील उपाययोजनांचाही वेध घेतला. ई-कचरा व्यवस्थापन उद्योग उभारणी हा सध्या निर्माण झालेला ई-कचरा संपुष्टात आणण्याचा महत्त्वाचा पर्याय असल्याचे सांगून त्या म्हणाल्या, दरवर्षी जगभरात निर्माण होणाऱ्या या कचऱ्याची किंमत ही जगातल्या कित्येक देशांच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नापेक्षाही अधिक आहे, यावरुन त्याचे गांभीर्य लक्षात यावे. एक टन सुवर्ण खनिजामध्ये जितके सोने सापडते, त्याहून शंभर पट अधिक सोने हे एक टन ई-कचऱ्यामध्ये असते. इतर धातूंच्या बाबतीतही हीच अवस्था आहे. त्यामुळे शास्त्रीय पद्धतीने रितसर ई-कचरा व्यवस्थापन प्रकल्प उभारून त्याद्वारे कमीत कमी प्रदुषण करून हे सारे धातू पुनर्वापरात आणणे अत्यावश्यक आहे. या बाबींचा विचार होणे आवश्यक आहे.




वेबिनारचे उद्घाटन करताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के. सोबत (डावीकडून) डॉ. महादेव देशमुख, डॉ. एम.के. भानारकर, डॉ. पवन गायकवाड, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील आणि डॉ. श्रीकृष्ण महाजन.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील म्हणाले, भावी पिढ्यांसाठी सुद्धा जग हे राहण्याचे एक चांगले ठिकाण म्हणून राखावयाचे असल्यास शाश्वत विकास या संकल्पनेची कास धरणे आवश्यक आहे. पर्यावरणस्नेही व पर्यावरण सुसंगत धोरणे आखून ई-कचऱ्याचे व्यवस्थापन करण्याची आवश्यकता आहे. उद्घाटनपर मनोगतात कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के म्हणाले, मानवाचे जीवन अधिकाधिक सुखकर करण्याच्या नादात आपण काही अनिष्ट बाबी केल्या. कचरानिर्मिती हा त्यातील महत्त्वाचा घटक आहे. आता प्रगतीने आपल्याला ई-कचऱ्याच्या समस्येपर्यंत आणून सोडले आहे. या समस्येवर मात करणे शक्य आहे. त्यासाठी प्रत्येक उत्पादन हे ई-कचरा व्यवस्थापनाच्या प्रोटोकॉलसहच बाजारात दाखल व्हायला हवे. विभागाचे प्रमुख डॉ. पवन गायकवाड यांनी स्वागत केले. वेबिनारचे समन्वयक डॉ. मुरलीधर भानारकर यांनी प्रास्ताविक केले. योगिता खोपर्डे व स्वप्नाली बांगडे या विद्यार्थिनींनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. एस. एम. मस्के यांनी आभार मानले.

यावेळी मानव्यशास्त्र विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. पी.ए. कदम, डॉ. एस. ए. शिंदे, एम. के. पंधारे यांच्यासह शिक्षक, प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

14 FEB 2024
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ई-कचरा व्यवस्थापन क्षेत्रात उद्योगनिर्मितीच्या संधी

## डॉ. रानिया लम्पाऊ; विद्यापीठात आंतरराष्ट्रीय वेबिनारला प्रारंभ

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

जगभरात दरवर्षी ६२.५ अब्ज डॉलर किमतीचा ई-कचरा निर्माण होत असल्याचे संयुक्त राष्ट्रांचा पर्यावरणविषयक अहवाल सांगतो. त्यामुळे आजघडीला ई-कचरा व्यवस्थापनाच्या क्षेत्रामध्ये उद्योगनिर्मितीच्या अनेक संधी आहेत. पर्यावरण स्वच्छ करण्यासाठी संशोधकांनी पुढे यावे, असे प्रतिपादन ग्रीस मंत्रालयाच्या शैक्षणिक सल्लागार डॉ. रानिया लम्पाऊ यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचा इलेक्ट्रॉनिक्स अधिविभाग व ई-कचरा व्यवस्थापन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने 'इलेक्ट्रॉनिक कचरा आणि शाश्वत विकास' या विषयावरील तीनदिवसीय आंतरराष्ट्रीय वेबिनारला प्रारंभ झाला. त्यावेळी बीजभाषक म्हणून त्या बोलत होत्या. तत्पूर्वी, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या उपस्थितीत उद्घाटन झाले.




**कोल्हापूर : विद्यापीठात आयोजित आंतरराष्ट्रीय वेबिनारच्या उद्घाटनप्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख.**

डॉ. लम्पाऊ म्हणाल्या, दरवर्षी जगभरात निर्माण होणाऱ्या ई-कचऱ्याची किंमत ही जगातल्या कित्येक देशांच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नापेक्षाही अधिक आहे. एक टन सुवर्ण खनिजामध्ये जितके सोने सापडते, त्याहून शंभर पट अधिक सोने हे एक टन ई-कचऱ्यामध्ये असते. त्यामुळे शास्त्रीय पद्धतीने रीतसर ई-कचरा व्यवस्थापन प्रकल्प उभारून त्याद्वारे कमीत कमी प्रदूषण करून हे सारे धातू पुनर्वापरात आणणे अत्यावश्यक आहे.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, ई-कचऱ्याचे अपव्यवस्थापन ही जागतिक समस्या आहे. ती सोडविण्यासाठी व्यापक संशोधनाबरोबरच ठोस व कडक धोरणे आखण्याचीही गरज आहे. प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, भावी पिढ्यांसाठी जग हे राहण्याचे एक चांगले ठिकाण म्हणून राखावयाचे असल्यास शाश्वत विकास या संकल्पनेची कास धरणे आवश्यक आहे. इलेक्ट्रॉनिक्स अधिविभागाचे प्रमुख डॉ. पवन गायकवाड यांनी स्वागत केले. वेबिनारचे समन्वयक डॉ. मुरलीधर भानारकर यांनी प्रास्ताविक केले. योगीता खोपर्डे व स्वप्नाली बांगडे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. एस. एम. मस्के यांनी आभार मानले. यावेळी डॉ. महादेव देशमुख, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. पी. ए. कदम, डॉ. एस. ए. शिंदे, एम. के. पंधारे उपस्थित होते.

14 FEB 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पर्यावरण स्वच्छतेसाठी संशोधकांनी पुढे यावे

## डॉ. रानिया लम्पाऊ; विद्यापीठात इलेक्ट्रॉनिक कचरा विषयावर आंतरराष्ट्रीय वेबिनार

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १३ : जगभरात दरवर्षी ६२.५ अब्ज डॉलर्स इतक्या किमतीचा ई-कचरा निर्माण होत असल्याचे संयुक्त राष्ट्रांचा पर्यावरणविषयक अहवाल सांगतो. त्यामुळे आज घडीला ई-कचरा व्यवस्थापनाच्या क्षेत्रामध्ये उद्योग निर्मितीच्या अनेक संधी आहेत. त्यांचा लाभ घेऊन पर्यावरण स्वच्छ करण्यासाठी संशोधकांनी पुढे यावे, असे प्रतिपादन ग्रीस मंत्रालयाच्या शैक्षणिक सल्लागार डॉ. रानिया लम्पाऊ यांनी आज केले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आंतरराष्ट्रीय वेबिनारमध्ये बीजभाषण करताना ग्रीसच्या डॉ. रानिया लम्पाऊ.

शिवाजी विद्यापीठाचा इलेक्ट्रॉनिक्स अधिविभाग आणि ई-कचरा व्यवस्थापन केंद्रातर्फे 'इलेक्ट्रॉनिक कचरा आणि शाश्वत विकास' या विषयावरील तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय वेबिनारला प्रारंभ झाला. त्यावेळी बीजभाषक म्हणून त्या बोलत होत्या. तत्पूर्वी, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत औपचारिक उद्घाटन झाले.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, ई-कचऱ्याचे अपव्यवस्थापन ही जागतिक समस्या आहे. ती सोडविण्यासाठी व्यापक संशोधनाबरोबरच ठोस कडक धोरणे आखावीत.

घनकचरा व ई-कचरा तयार करणाऱ्यांकडून अतिरिक्त कर वसूल करून तो स्थानिक आस्थापनांकडे सुपूर्द करावा.' डॉ. महादेव देशमुख, श्रीकृष्ण महाजन, पी. ए. कदम, एस. ए. शिंदे, एम. के. पंदारे उपस्थित होते. इलेक्ट्रॉनिक्स अधिविभागाचे प्रमुख डॉ. पवन गायकवाड यांनी स्वागत केले. वेबिनारचे समन्वयक डॉ. मुरलीधर भानारकर यांनी प्रास्ताविक केले. योगीता खोपर्डे, स्वप्नाली बांगडे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. एस. एम. मस्के यांनी आभार मानले.

### चार्जिंगसाठी टाइप-सी पोर्ट बंधनकारक

**डॉ. लम्पाऊ म्हणाल्या, ई-कचऱ्याचे प्रमाण कमी करण्यासाठी चार्जिंग साधनांमध्ये एकरूपता आणण्याचीही आवश्यकता आहे. त्यादृष्टीने युरोपियन युनियनमध्ये २०२४च्या अखेरपर्यंत सर्व इलेक्ट्रॉनिक वस्तूंमध्ये चार्जिंगसाठी टाइप-सी पोर्ट देणे बंधनकारक केले आहे. लॅपटॉपही एप्रिल २०२६पर्यंत यूएसबी टाइप-सीने सुसज्ज असतील.**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 FEB 2024
पुढारी

# शिवाजी विद्यापीठाची आज अधिसभा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ अधिसभेची (सिनेट) बैठक बुधवारी (दि. १४) सकाळी ११ वाजता राजर्षी शाहू सभागृहात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे प्रमुख उपस्थित असणार आहेत.



अधिसभेत ७९ ठराव व ३२ प्रश्न उपस्थित केले जाणार आहेत. तसेच आर्थिक वर्षाचे बजेट सादर केले जाणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 FEB 2024
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठाचे वार्षिक बजेट आजा सादर होणार

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाची अधिसभा १४ रोजी सकाळी ११ वाजता राजर्षी शाहू सभागृहात सुरू होणार आहे. या अधिसभेत वार्षिक बजेट सादर केले जाईल. तसेच ७९ ठराव आणि ३२ प्रश्नांवर चर्चा होणार आहे. ही अधिसभा सुरळीत पार पाडण्यासाठी सुरक्षारक्षकांसह पोलीस बंदोबस्त करण्यात आला आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेत विविध सदस्यांनी प्रश्न उपस्थित करीत ठरावही मांडले आहेत. यामध्ये अधिकार मंडळांच्या सभांची ध्वनिमुद्रण केले जाते काय, अहिल्याबाई होळकर अध्यासनाची स्थिती काय आहे, राजर्षी शाहू संगीत व कला महोत्व खंडित केला आहे काय? विद्यापीठ प्रशासनातील किती कर्मचाऱ्यांची शासकीय कामासाठी नियुक्त केली जाते. कायमस्वरूपी किती सेवकांची नियुक्ती केली. विद्यापीठाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या व्याख्यानमाला आदी विषयी अधिसभा सदस्यांकडून प्रश्न मांडले जाणार आहेत. यासह ३२ प्रश्न उपस्थित केले आहेत, यापैकी किती प्रश्नावर चर्चा होणार हे पाहावे लागेल. तर आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धा, योगा विषयावर अभ्यासक्रम तयार करा, शुटींग रेंज खेळ, वाचन प्रेरणा दिवस, रिसर्च इन सेंटर फॉर पॉलिसी, अल्युमिनी असोसिएशनचे काम सुरू आहे का आदी ७९ ठराव मांडण्यात येणार आहेत. परंतू ठरावावर चर्चा झाल्यानंतर किती ठराव मंजूर, किती नामंजूर आणि किती मागे घेतले याकडे शिक्षण वर्तुळाचे लक्ष आहे.

जनसंपर्क कक्ष
14 FEB 2024 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अर्थसंकल्पात विकसित भारताचे प्रतिबिंब : प्रा. देशमुख

## 'अंतरिम अर्थसंकल्प: एक दृष्टिक्षेप' विषयावर व्याख्यान

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

संसदेत सादर करण्यात आलेल्या अंतरिम अर्थसंकल्पातून शाश्वत विकसित भारताचे प्रतिबिंब दिसत असल्याचे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठातील अर्थशास्त्र विभागाचे प्राध्यापक व मानव्यशास्त्र विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. एस. एम. देशमुख यांनी केले.

विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र अर्थशास्त्र विषयाअंतर्गत नुकत्याच संसदेत सादर करण्यात आलेल्या केंद्रीय अर्थसंकल्प यावर 'अंतरिम अर्थसंकल्प-२०२४ : एक दृष्टिक्षेप' या विषयावर विशेष ऑनलाईन व्याख्यान आयोजित करण्यात आलेले होते.त्यावेळी ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे उपस्थित होते. यावेळी उपकुलसचिव डॉ. एस. एम. कुबल, सी. ए. कोतमिरे, समन्वयक, सहा. प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

प्रा. डॉ. देशमुख म्हणाले की, सबका साथ, सबका विकास या घोषवाक्यातून शाश्वत विकासाचा मंत्र देण्याचे काम अर्थसंकल्प करतो. विकसित भारताची संकल्पना गतिशील करण्यासाठी सरकारी योजनांचा फायदा सर्व सामन्यापर्यंत पोहोचविण्याची यंत्रणा अर्थसंकल्पाच्या माध्यमातून करण्यात येत आहे. तरुण, शेतकरी, महिला यांच्या सबलीकरणासाठी अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आलेली आहे. शेतकऱ्यांना अन्नधान्य उत्पादनाची क्षमता वाढविण्यासाठी प्रगतीशील योजना आणण्यात येत आहेत. त्यामुळे शाश्वत विकासाची पाऊले अर्थसंकल्पात दिसून येते असल्याचे यांनी सांगितले.

स्वागत व प्रास्ताविक समन्वयक सहा.प्राध्यापक डॉ. चांगदेव बंडगर यांनी केले, तर पाहुण्यांची ओळख अर्थशास्त्र विषयाचे सहा.प्रा. डॉ. प्रसाद दावणे यांनी करून दिली. सूत्रसंचालन प्रा. डॉ. नितीन रणदिवे यांनी केली. प्रा. डॉ. संजय चोपडे यांनी आभार मानले.